मुंबई| वर्ष : 02 | अंक : 6 | एप्रिल 30, 2020 | पृष्ठसंख्या : 16 | किंमत : 5 रुपये

पाक्षिक

मनोगत

प्रदेश बीजेपी

दो गज दूरी

‘दो गज दूरी’ मंत्राचे पालन करा

‘कोरोना’चा सामना करण्यासंदर्भात पुढील नियोजनासाठी पंतप्रधानांचा मुख्यमंत्र्यांशी संवाद

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोविड-१९ चा सामना करण्यासंदर्भात पुढील नियोजन आणि उद्भवलेल्या परिस्थितीबाबत चर्चा करण्यासाठी सोमवार २७ एप्रिल रोजी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी संवाद साधला. पंतप्रधानांनी मुख्यमंत्र्यांशी साधलेला हा चौथा संवाद होता. यापूर्वी २० मार्च, २ एप्रिल आणि ११ एप्रिल रोजी त्यांनी संवाद साधला होता.

गेल्या दीड महिन्यांत हजारो लोकांचे प्राण वाचवण्यात देशाला यश आले असून लॉकडाऊनचे सकारात्मक परिणाम झाल्याचे पंतप्रधानांनी अधोरेखित केले. ते पुढे म्हणाले की, भारताच्या लोकसंख्येची इतर अनेक देशांच्या एकत्रित लोकसंख्येशी तुलना करता येईल. मार्चच्या सुरुवातीला भारतासह अनेक देशांमधील परिस्थिती जवळपास सारखीच होती. मात्र वेळेवर केलेल्या उपाययोजनांमुळे भारत अनेक लोकांचे रक्षण करू शकला आहे. त्याचबरोबर त्यांनी पूर्वसूचना देखील दिली कि विषाणूचा धोका अद्याप संपलेला नाही आणि सतत सतर्क राहणे सर्वाधिक महत्वाचे आहे.

पंतप्रधान म्हणाले की, देशाने आतापर्यंत दोन लॉकडाऊन पाहिले आहेत, दोन्ही विशिष्ट बाबींमध्ये वेगळे आहेत आणि आता आपल्याला पुढील वाटचालीबाबत विचार करायचा आहे. ते म्हणाले की तज्ञांच्या मताप्रमाणे कोरोना विषाणूचा प्रभाव पुढील काही महिने दिसत राहणार आहे. ‘दो गज दूरी’ या मंत्राचा पुनरुच्चार करत ते म्हणाले की, पुढले काही दिवस मास्क आणि फेस कव्हर्स हे आपल्या जीवनाचा भाग बनणार आहेत. या परिस्थितीत प्रत्येकाचे उद्दिष्ट जलद प्रतिसाद हे असायला हवे असे ते म्हणाले. अनेकजण खोकला आणि सर्दी किंवा लक्षणे आहेत की नाही हे स्वत: जाहीर करत आहेत आणि हे स्वागतार्ह चिन्ह आहे.

पंतप्रधान म्हणाले की कोरोना विरुद्ध लढा सुरू ठेवण्याबरोबरच आपल्याला अर्थव्यवस्थेला देखील महत्त्व द्यायचे आहे. तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करण्याच्या महत्वावर आणि सुधारणा स्वीकारण्यासाठी या वेळेचा वापर करण्यावर त्यांनी भर दिला. कोविड-१९ विरोधातील लढाईत देशाच्या प्रयत्नांना चालना देण्यासाठी अधिकाधिक लोक आरोग्यसेतू अॅप डाऊनलोड करतील हे सुनिश्चित करण्याच्या महत्वावर त्यांनी भर दिला. ते म्हणाले, आपण शूर बनायला हवे आणि सामान्य नागरिकांच्या जीवनाला स्पर्श करणाऱ्या सुधारणा घडवून आणायला हव्यात . साथीच्या आजाराशी लढण्यासाठी आणि संशोधनाला व नावीन्यतेला बळकटी देण्यासाठी विद्यापीठांशी संबंधित लोकांना एकत्र आणता येईल.

हॉटस्पॉट्स म्हणजेच रेड झोन भागात मार्गदर्शक बंधने लागू करणे राज्यांसाठी महत्वपूर्ण असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. ते म्हणाले की रेड झोन ऑरेंज झोनमध्ये आणि त्यानंतर ग्रीन झोनमध्ये परिवर्तित करण्याच्या दिशेने राज्यांचे प्रयत्न असायला हवेत.

परदेशी असलेल्या भारतीयांना आणण्याच्या मुद्यावर ते म्हणाले की, त्यांची गैरसोय होणार नाही आणि त्यांच्या कुटुंबियांना कोणताही धोका नाही, हे लक्षात ठेवून हे करायला हवे. पुढली रणनीती आखताना हवामानातील बदल - उन्हाळा आणि पावसाळा - आणि या ऋतूत होणारे संभाव्य आजार याकडे लक्ष केंद्रित करण्याची सूचना पंतप्रधानांनी मुख्यमंत्र्यांना केली.

जास्तीत जास्त लोकांचे प्राण वाचवण्यासाठी लॉकडाऊनची अंमलबजावणी करणे गरजेचे होते याचा केंद्रीय गृहमंत्र्यांनी या बैठकीत पुनरुच्चार केला.

या संकटकाळात पंतप्रधानांच्या नेतृत्वाची मुख्यमंत्र्यांनी प्रशंसा केली आणि विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी त्यांनी केलेल्या उपाययोजना अधोरेखित केल्या. त्यांनी आंतरराष्ट्रीय सीमांवर बारीक नजर ठेवण्याची गरज तसेच आर्थिक आव्हानांवर तोडगा आणि आरोग्यविषयक पायाभूत सुविधांना अधिक चालना देण्याच्या उपायांवर चर्चा केली. ‘कोरोना’ विरुद्ध लढ्यात पोलिस दल आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामाप्रती नेत्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

स्वयंपूर्ण, स्वयंसिद्ध होणे ही काळाची गरज - नरेंद्र मोदी

पंतप्रधानांच्या हस्ते इ-ग्रामस्वराज ॲप आणि स्वामित्व योजनेचा प्रारंभ

राष्ट्रीय पंचायती राज्य दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी २४ एप्रिल रोजी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे देशभरच्या सरपंचांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी इ-ग्रामस्वराज पोर्टल आणि मोबाईल ॲपचा तसेच स्वामित्व योजनेचा प्रारंभ केला.

ग्रामपंचायतींना विकासाचे नियोजन करण्यासाठी व ते प्रत्यक्षात आणण्यासाठी इ-ग्रामस्वराजची मदत होणार आहे. या संकेतस्थळामुळे रिअलटाइम म्हणजेच ज्या-त्या क्षणी देखरेख व उत्तरदायित्व सांभाळणे शक्य होणार आहे. ग्रामपंचायत स्तरापर्यंत डिजिटायझेशन म्हणजेच संगणकीय अंकीकरण घेऊन जाण्यासाठी हे संकेतस्थळ म्हणजे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

स्वामित्व योजना सध्या ६ राज्यांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर सुरु करण्यात आली आहे. ड्रोन तंत्रज्ञान आणि अत्याधुनिक सर्वेक्षण पद्धती वापरून, ग्रामीण भागातील वसतीक्षेत्रे आरेखित करण्याचे काम याद्वारे होणार आहे. शिस्तबद्ध नियोजन, महसुलाचे संकलन, आणि ग्रामीण भागातील मालमत्ता अधिकाराबद्दल एक स्पष्ट कल्पना मिळण्यासाठी या योजनेचा उपयोग होईल. या योजनेतून दिल्या जाणाऱ्या 'टायटल डीड'मुळे मालमत्तेवरून होणारे तंटे व वादविवाद संपुष्टात येतील.

कोरोना साथरोगामुळे लोकांची कार्यपद्धती बदलली आहे आणि एक चांगला धडाही शिकायला मिळाला आहे. सदैव स्वयंसिद्ध असण्याची शिकवण या आजाराने दिली आहे असे पंतप्रधानांनी देशभरच्या सरपंचांशी बोल-ताना सांगितले.

साथीच्या या आजाराने अनेक नवीन आव्हाने व अकल्पित समस्या उभ्या केल्या, मात्र आपल्याला सर्वांना एक नवा शक्तिशाली संदेशही दिला- आपण स्वयंपूर्ण आणि स्वयंसिद्ध झालेच पाहिजे. प्रश्नांची उत्तरे देशाबाहेर शोधता कामा नये, हा सर्वात मोठा धडा आपण शिकलो आहोत.

प्रत्येक गाव आपल्या मूलभूत गरज भागविण्याइतके स्वयंपूर्ण असलेच पाहिजे. तसेच, प्रत्येक जिल्हा, त्याच्या पातळीपर्यंत स्वयंपूर्ण असला पाहिजे, प्रत्येक राज्य स्वयंसिद्ध असले पाहिजे आणि सारा देशही त्याच्या पातळीवर स्वयंसिद्ध असला पाहिजे, असे ते म्हणाले.

गावांना स्वयंपूर्ण करण्यासाठी आणि ग्रामपंचायतींना बळकट करण्यासाठी सरकारने कसून प्रयत्न केल्याचेही नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

गेल्या पाच वर्षात जवळपास १.२५ लाख ग्राम पंचायती ब्रॉडबँड सुविधेने जोडल्या गेल्या आहेत, पूर्वी हाच आकडा जेमतेम शंभर होता. तसेच, सामायिक सेवा केंद्रांची संख्याही ३ लाखापलीकडे गेली आहे, असेही ते म्हणाले.

मोबाईल फोन्सचे उत्पादन भार-तात होत असल्याने, स्मार्टफोनच्या किंमती उतरल्या आहेत. त्यामुळे प्रत्येक खेड्यात स्वस्त स्मार्टफोन पोहोचले आहेत. यातून, पुढे, गावपातळीवर डिजिटल पायाभूत सुविधा आणखी भक्कम होऊ शकतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पंचायतींच्या प्रगतीमुळे निश्चितपणे देशाचा आणि लोकशाहीचा विकास होत जाईल, असेही पंतप्रधान म्हणाले.

पंतप्रधान आणि ग्रामपंचायतींचे प्रतिनिधी यांच्यात थेट संवाद घडण्याची संधी आजच्या कार्यक्रमामुळे निर्माण झाली.

व्यक्ती-व्यक्तींमधील उचित सामाजिक अंतर स्पष्ट करून सांगणारा- 'दो गज दूरी' म्हणजे 'दोन हातांचे अंतर' हा साधासोपा मूलमंत्र सांगितल्याबद्दल, पंतप्रधानांनी सरपंचांशी बोलताना खेडेगावांचे कौतुक केले.

ग्रामीण भारताने दिलेले - 'दो गज देह की दूरी' म्हणजे, 'दोन हात अंतरावर थांबणे' हे घोषवाक्य म्हणजे, लोकांच्या शहाणपणाचे व चतुराईचे द्योतक आहे.अशा शब्दात त्यांनी या घोषवाक्याचे कौतुक केले. या वाक्यामुळे लोकांना उचित सामाजिक अंतर राखण्याची प्रेरणा मिळते, असेही ते म्हणाले.

भारताकडे मर्यादित संसाधने असू-नही, भारताने हे आव्हान वेळेपूर्वीच चाणाक्षपणे कृती करून समर्थपणे पेलले आहे, आणि नवीन ऊर्जेने व नव्या मार्गांचा अवलंब करून पुढे जात राहण्याचा निश्चय प्रकट केला आहे., असे प्रतिपादन त्यांनी केले.

ते म्हणाले, खेड्यांची सामूहिक शक्ती, देशाला पुढे घेऊन जाण्यासाठी सहाय्यभूत ठरत आहे. असे सगळे प्रयत्न सुरु असताना, आपण याचेही भान ठेवले पाहिजे की, कोणा एकाच्या चुकीमुळे सारे गाव धोक्यात येऊ शकते. म्हणूनच प्रयत्नात शिथिलता येऊन चालण्यासारखे नाही, यावर पंतप्रधानांनी भर दिला.

गावांमध्ये स्वच्छता मोहीम राबविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन पंतप्रधानांनी सरपंचांना केले. तसेच, वृद्ध, दिव्यांग व्यक्ती, आणि गावातील अन्य गरजूंची काळजी घेणे, विलगीकरण, सामाजिक अंतराचे भान, मास्क घालून चेहरा झाकून घेणे- याची काळजीही घेण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

कोविड -१९ च्या विविध मुद्यांबद्दल गावातील प्रत्येक कुटुंबाला अचूक माहिती पुरविण्याचे आवाहन त्यांनी सर्व सरपंचांना केले. ■

वाचनसंस्कृती वाढीस लागण्यासाठी भाजपा प्रदेशाध्यक्ष आ. चंद्रकांतदादा पाटील यांचा पुढाकार

कोथरुडमधील सोसायट्यांमध्ये पुस्तकांचे वाटप

लॉकडाऊनच्या काळात नागरिकांकडून त्याचा फज्जा उडणे, विनाकारण फिरत राहणे यामुळे प्रशासनावरचा ताण वाढत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये लॉकडाऊनचे पालन व्हावे आणि वाचन संस्कृती वाढीस लागावी यासाठी भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आणि कोथरुडचे आमदार चंद्रकांतदादा पाटील यांनी पुढाकार घेतला आहे. श्री. पाटील यांनी कोथरुड मधील सोसायट्यांमध्ये पुस्तकांचे वाटप केले आहे.

सध्या पुण्यात कोरोनाबाधितांची संख्या वाढत आहे. त्यातच अनेक भागांत लॉकडाऊनचा फज्जा उडताना दिसत आहे. तसेच तरुण वर्ग विनाकारण रस्त्यांवर फिरत आहेत. तर अनेक ठिकाणी सोसायटीच्या आवारात विरंगुळ्यासाठी गर्दी करत आहेत. त्यामुळे संचारबंदीच्या नियमांची पायमल्ली होत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये वाचन संस्कृती वाढीस लागावी यासाठी भाजपा प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रकांतदादा पाटील यांनी पुढाकार घेत, आपल्या मतदारसंघात पुस्तकांचे वाटप केले आहे. मतदारसंघातील अनेक सोसायट्यांमध्ये पुस्तके उपलब्ध करून दिली आहेत.

यासोबतच लॉकडाऊननंतर अडचणीत असलेल्यांसाठी भोजन व्यवस्था केली आहे. तसेच गरजू कुटुंबांना शिधा वाटप आणि वयोवृद्ध व्यक्तींना २५ टक्के सवलतीच्या दरात औषधे घरपोच देण्यात येत आहे. त्याचबरोबर पुण्यातील कोरोनाबाधितांची सेवा करणार्या डॉक्टर, परिणाम यांना स्वसंरक्षणासाठी पीपीई किटचे वाटप देखील करण्यात आले आहे.

पुण्यासाठी सर्व प्रकारच्या सहकार्याची तयारी

महाराष्ट्रात एकूणच करोनाचे संकट नियंत्रणात येत असतानाच मुंबई व परिसर, व पुण्यमध्ये हे संकट गडद होत चालले आहे. आज पुण्यातील संख्या ७०० च्या पुढे गेली आहे. त्यामुळे प्रशासनाच्या काय उपाययोजना सुरू आहेत याची माहिती घेण्यासाठी, काही सूचना करण्यासाठी, सहकार्याचा हात पुढे करण्यासाठी आज भा.ज.पा. चे प्रदेश अध्यक्ष आमदार चंद्रकांत पाटील व महापौर मुरलीधर मोहोळ यांनी पुण्याचे पोलीस आयुक्त व महानगरपालिका आयुक्तांची भेट घेऊन चर्चा केली...

१) पुण्यात ज्या भागांमध्ये रुग्ण सापडत आहेत त्यासाठी सुरक्षा कडक करावी

२) लोकांनी १० दिवस घराच्या बाहेर पडू नये यासाठी प्रशासनाने दूध पावडर सहित (जेणे करून दुधासाठी बाहेर पडू नये) धान्य व किराणा सामानाचे किट ह्या भागातील लोकांना मोफत द्यावे.

३) ६० वर्षावरील सर्वांना (घरच्यांच्या संमतीने) लक्षणे दिसत नसतानाही जवळच्या शाळा, मंगल कार्यालये, लॉजेस, हॉटेल्स मध्ये स्थलांतरित करावे (अतिशय चांगल्या सुविधा त्या ठिकाणी असाव्यात)

४) केंद्रीय आरोग्य खात्याच्या सूचनेनुसार परंतु रोगप्रतिकारशक्ती वाढवणारी आयुर्वेदीक, होमियोपॅथिक औषधे नागरिकांना वाटावीत.

अश्या सूचना त्यांनी केल्या व सर्वप्रकारच्या सहकार्याची तयारी दर्शवली...

कुणाचेही एक पैशाचे कर्ज माफ केलेले नाही - निर्मला सीतारामन

सार्वजनिक बँकांची कर्जे वे ऑफ करणे आणि राईट ऑफ करणे यात काय फरक असतो हे तुम्हाला माहीत नसेल तर अर्थतंज्ञ आणि माजी पंतप्रधान डॉ . मनमोहन सिँग यांच्याकडून समजून घ्या , उगाच बिनबुडाचे आरोप करून दिशाभूल करू नका , असा सणसणीत टोला केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी राहुल गांधींना लगावला आहे.कोणाचे एका रुपयाचेही कर्ज माफ केले गेलेले नाही , असे सीतारामन यांनी नि:संदिग्धपणे सांगितले.

राहुल गांधींनी केलेल्या आरोपांचे मंगळवारी रात्री अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी लागोपाठ १३ ट्विट करून उत्तर दिले. राहुल गांधी आणि काँग्रेसचे प्रवक्ते रणदीप-सिंह सुरजेवाला नागरिकांची दिशाभूल करीत आहेत. बुडित कर्जाच्या बाबतीत राहुल यांनी माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्याशी चर्चा केली असती तर बरे झाले असते, असे सीतारामन म्हणाल्या, तर राहुल गांधी यांनी माजी केंद्रीय अर्थमंत्री पी. चिदंबरम यांची शिकवणी लावावी, असा सल्ला केंद्रीय माहिती व नभोवाणीमंत्री प्रकाश जासन २००९ ते २०१४ दरम्यान विविध बैंकांनी १,४५,२२६ कोटी रुपयांचे कर्ज बुडीत खात्यात टाकले. राहुल गांधी यांनी ते कसले बुडीत खाते होते याची माहिती मनमोहन सिंग यांच्याकडून घ्यावी असा सल्ला सीतारामन यांनी दिला. थकीत कर्जाबाबत रिजर्व बैंकेने चार वर्षांचे प्रावधान चक्राच्या हिशोबाने नियम तयार केले आहेत. हे चक्र पूर्ण होताच असे थकीत कर्ज बुडीत खात्यात टाकण्यात येते, परंतु थकबाकीदारांकडून वसुलीचे प्रयत्न सुरूच असतात. कोणतेही कर्ज माफ केले नाही असे सीतारामन यांनी स्पष्ट केले.

मेहुल चोकसीची १९३६ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीची संपत्ती जप्त अटॅच केली आहे. त्यामध्ये ६७.९ कोटी रुपये किमतीची विदेश्तील संपत्ती देखील अटॅच करण्यात आली आहे. याशिवाय मेहुल चोकसी याची ५९७.७५ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. तसेच त्याच्या विरोधात रेड कॉर्नर नोटीस सुद्धा काढण्यात आली आहे. चोकसी याच्या प्रत्यार्पणासाठी एंटीगुआ कडे अर्ज करण्यात आला आहे व त्याला फरारी घोषित करण्यात आले आहे. अर्थमंत्र्यांनी ट्वीटमध्ये स्पष्ट केले की विजय माल्याची सुमार ८,०४० कोटी रुपयांची संपत्ती अटॅच करण्यात आली आहे आणि १,६९३ कोटी रुपयांचे शेअर्स जप्त करण्यात आले आहेत. इंग्लंडमध्ये माल्याच्या प्रत्यार्पणाची कार्यवाही सुरु असून त्याला फरारी घोषित करण्यात आले आहे. सीतारामन यांनी देशातून फरार झालेला आरोपी नीरव मोदी सध्या इंग्लड येथील तुरुगांत असून त्याची सुमारे २,३८७ कोटी रुपयांची संपत्ती शासनाने अटॉच केली आहे असे सीतारामन यांनी सांगितले.वडेकर यांनी दिला. हे तूपुरस्सर कर्जफेड न करणारे ५० प्रमुख कर्जबुडवे हे यूपीए सरकारच्या फोन बँकिंगचे लाभार्थी आहेत, अशी टीका सीतारामन यांनी केली. या कर्जबुडव्यांची ६८ हजार ६०७ कोटींची कर्जे तांत्रिकदृष्ट्या बुडित खात्यात टाकण्यात आली आहेत. २००९-१० आणि २०१३-१४दरम्यान व्यावसायिक बँकांनी १ लाख ४५ हजार २२६ कोटी रुपयांची कर्जे बुडित खात्यात टाकली होती, याचे स्मरण सीतारामन यांनी करून दिले, तर कोणचाही एकही पैसा माफ करण्यात आलेला नाही. कर्ज बुडित खात्यात टाकणे म्हणजे माफ करणे होत नाही, असे जावडेकर म्हणाले.

बड्या कर्जदारांच्या थकीत कर्जाबाबत काँग्रेसच्या काळात रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदी नियुक्त केले गेलेले रघुराम राजन यांनी २०१५ मध्ये काय म्हण्टलं होतं हे पाहू ,

' सरकारी बँकांची आज जी कर्जे थकीत दिसत आहेत ती २००६- २००८ या काळातील आहेत. ज्यांनी पूर्वीही कर्ज थकविली होती अशा मंडळींना २००६ ते २००८ या काळात सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी मुक्त हस्ताने कर्जे दिली. या मंडळींना खासगी बँकांनी कर्ज देण्यास नकार दिला होता . मात्र सरकारी बँकांनी त्यांना कर्जे दिली. त्यावेळीच रिझर्व्ह बँकांनी या कर्जाबाबत सावधानतेचा इशारा द्यायला हवा होता. मात्र तसे झाले नाही. काँग्रेसच्या काळात दिलेली कर्ज थकीत आहेत . ही कर्जे वसूल करण्याचे प्रयत्न वेगवेगळ्या मार्गातून चालू आहेत. कर्जदारांच्या मालमत्तांमधून ही कर्जे वसूल केली जात आहेत, असेही निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे.

वे ऑफ आणि राईट ऑफ यातला फरक मनमोहन सिंगांकडून समजून घ्या

दिवंगत अर्थमंत्री अरुण जेटली यांच्या कार्यकाळात २.४१ लाख करोड रुपयांचे बड्या कर्ज बुडव्या धेंडांचे कर्ज माफ केल्याचे आरोप कॉंग्रेस पक्षाने खळबळ उडवून दिली होती. त्यांनी तेव्हा शब्द वापरला होता वे ऑफ. आपल्या इथल्या विद्वान संपादकांनी पण हा आरोप हातोहात घेत या आरोपाची बातमी बनवत याला मराठीत कर्ज माफी असे लिहीत बातमी बनविली होती. तेव्हा तत्कालीन अर्थमंत्री अरुण जेटली यांनी संसदेत संबंधित आरोपांना उत्तर देत विरोधकांची बोलती बंद केली होती. अरुण जेटली यांनी संसदेत या कर्ज माफीच्या आरोपांना उत्तर देतांना त्या कर्जाला राईट ऑफ केल्याचे सांगितले होते. सोबतच कॉंग्रेसने आरोप करतांना जो शब्द वे ऑफ वापरला तो चुकीचा तर आहेच पण कॉंग्रेसच्या खोट्या आणि हीन मनोवृत्तीचे दर्शन घडवणारा आहे अशी पुस्तीही जोडली होती.

तर हा राईट ऑफ नक्की काय प्रकार आहे? थोडक्यात सांगायचे तर राईट ऑफ एक लेखा क्रिया आहे जी एकाच वेळी उत्तरदायित्वाच्या खात्यावर डेबिट करताना मालमत्तेचे मूल्य कमी करते.हे मुख्यत: न चुकता कर्जाच्या जबाबदा ्या, न मिळालेल्या प्राप्तीयोग्य वस्तू किंवा संचयित मालवरील नुकसानाची भरपाई करण्याचा व्यवसाय करणार्याब व्यवसायांद्वारे सर्वात शाब्दिक अर्थाने वापरला जातो. साधारणपणे याला मोठ्या प्रमाणावर असेही म्हटले जाऊ शकते जे वार्षिक कर बिल कमी करण्यास मदत करते.

संसदेत उत्तर देतांना केंद्रीय वित्त राज्यमंत्री श्री शिव प्रताप शुक्ल यांनी सांगितले होते कि, कर्ज राईट ऑफ करणे म्हणजे कर्ज माफ करणे नाही. २०१४ – २०१५ च्या आर्थिक वर्षांपासून सप्टेंबर २०१७ मधील जवळपास २.४१ लाख करोड रुपयाचे कर्ज राईट ऑफ केल्या गेले होते. म्हणजेच हे फसलेले कर्ज म्हणजेच एनपीए, राईट ऑफ म्हणजेच बट्टा खात्यात टाकले होते. या कवायतीने बँकांना आपल्या वही खात्यांना बरोबर करत टैक्सेशन इफीशिएंसी मिळवायला मदत होईल, हि एक सामान्य प्रक्रिया आहे आणि या करता भारतीय रिजर्व बँकेची मार्गदर्शक तत्वे पण आहे, आणि हि २.४१ लाख करोड रुपयाची कर्जे राईट ऑफ करतांना रिजर्व बँकेची मार्गदर्शक तत्वे पूर्ण पाळल्या गेली आहे. तसेच थकीत कर्जाच्या वसुलीसाठी सरकार कुठेही तडजोड करत नाहीये, आणि या राईट ऑफ कोणताही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष फायदा कर्ज बुडव्यांना होणार नाहीये.

आता हे सगळे सांगायचे कारण काय? तर पुन्हा शिळ्या कढीला ऊत आणायचा प्रकार देशातील विरोधकांनी आणि विद्वान संपादकांनी केला आहे, कारण कोण्या साकेत गोखले नावाच्या माणसाने आरटीआय अंतर्गत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देतांना भारतीय रिजर्व बँकेने वरील माहिती देतांना गेल्या वित्तीय वर्षातील एकूण ६८ हजार करोड रुपयाची फसलेली कर्जे राईट ऑफ केल्या गेली असे असे सांगितले. त्या बरोबर पुन्हा कॉंग्रेस आणि विद्वान संपादकांनी पुन्हा, कर्ज बुडव्या बड्या धेंडांची कर्जे माफ म्हणत उर बडवायला सुरवात केली. एक तर कॉंग्रेस कडे असलेले तथाकथित जगप्रसिद्ध अर्थशास्त्री यांना व्यवस्थित अर्थशास्त्र शिकवीत नाहीत किंवा हे अर्थशास्त्री कॉप्या मारून पास झालेले असायला हवे. निदान कॉंग्रेसने आपण अगोदर संसदेत काय प्रश्न विचाले आणि त्यावर आपल्याला काय उत्तर आले होते हे तपासून तरी पाहायला हवे होते.

कारण असल्या तथ्यहीन आरोपाने फक्त धुराळा उडण्याखेरीज काहीच हा–तात लागत नाही. खरी गोष्ट अशी आहे कि णझ– काळात विचार न करता, बेकायदेशीर रित्या दिलेली कर्जेच आज एनपीए बनून बँकांवर बसली आहे आणि अशी कर्जे ऋणकोंच्या मालमत्तेची विक्री करून वसूल करणे शक्य व्हावे यासाठी कायदेशीर तरतूद करणारे 'इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्सी कोड' वर्तमान सरकारनेच आणले. त्याअंतर्गत आजवर लाखो कोटींची बुडीत कर्जे वसूलही करण्यात आली आहेत. भारतातील बँकांचे देश बाहेर पळून गेलेल्या कर्ज बुडव्यांची संपत्ती तर जप्त केलेलीच आहे, सोबत त्यांना देशाअंतर्गत किंवा देशा बाहेर कायदेशीर कारवाईला तोंड पण द्यावे लागत आहे.

तेव्हा पुन्हा पुन्हा तोंडावर पडणाऱ्या कॉंग्रेस आणि विद्वान अर्थशास्त्रींनीं आपल्या अभ्यास पूर्ण करावा आणि नंतर अधिक चांगल्या कायद्याचे निकष पूर्ण करणाऱ्या पुराव्यानिशी सरकारवर आरोप करावे.

राफेल प्रकरणी राहुल बाबाने असेच बेफाम आरोप केले होते.न्यायालयात त्यांना एकही आरोप सिद्ध करता आला नाही, शेवटी त्यांना माफी मागावी लागली. माफीही त्यांनी निर्लज्जपणे मागितली.

कॉंग्रेस प्रवक्ते सुरजेवाला यांनी २८ एप्रिलला पत्रकार परिषदेत आरोप करताना केंद्र सरकारकडे कोरोंना महामारीविरुद्ध लढण्यासाठी राज्यांना द्यायच्या मदतीचे आणि जीएसटीचे राज्यांचे देय पैसे द्यायला पैसे नाहीत पण थकीत कर्जाचे कोट्यवधी रुपये राइट ऑफ करायला पैसे आहेत. मोदी सरकारच्या प्राथमिकता चुकीच्या आ–हेत. हे सरकार चोर लोकांच्या पाठीशी उभे रहाणारे सरकार आहे. असे विधान केले. त्यांनी मुद्दाम होऊन दोन गोष्टी नजरेआड केल्या १) कर्जे राइट ऑफ करण्याची तारीख ३०/०९/२०१९ होती .करोंना २०२० मध्ये आला. २) कर्जे राइट ऑफ करणे हे काम पुस्तकी नोंदीने (Book Entry) केले जाते त्यात कोणी कोणाला पैसे देत किंवा ट्रान्सफर करीत नाही. परंतु मोदी द्वेषाने आंधळ्या झालेल्या श्री सुरजेवाला यांना जनतेची दिशाभूलच करायची असल्याने त्यांनि या सत्या कडे दुर्लक्ष करणे पसंत केले.

भाजपा सरकार आल्यावरच एनपीए च्या तरतुदींची काटेकोर अंमलबजावणी केल्याने ही थकीत कर्जे पूर्णपणे जनतेसमोर आली.सर्व थकीत कर्जे वसुलीची कठोर पावले फक्त भाजपाच्या शासन काळात घेतली गेली. एकूण ९९६७ वसुलीचे दावे,एकूण ३५१५ पोलिस तक्रारी (एफआयआर) भाजपा शासनाने दाखल केल्या आहेत. कर्ज राइट ऑफ केले याचा अर्थ वेव ऑफ केले (कर्जदाराला कर्ज माफ केले) असा होत नाही. या करजांची वसुलीची प्रक्रिया चालूच रहाते. जी रक्कम वसूल होते ती बँकेच्या नफ्यामध्ये धरली जाते.

आर्थिक प्रगतीसाठी शेतीचा खरीप हंगाम मोलाचा : देवेंद्र फडणवीस

केंद्रीय कृषीराज्यमंत्री रूपाला यांच्यासमवेत राज्यातील शेतकरी प्रतिनिधींशी चर्चा

मुंबई : कोरोनामुळे आर्थिक गतिविधी मंदावल्या असताना यंदाचा खरीप हंगाम यशस्वी झाला, तर त्यामुळे अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळेल. त्यामुळे हा हंगाम यशस्वी करण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे, असे आवाहन माजी मुख्यमंत्री आणि विधानसभेतील विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी आज केले.

राज्यातील शेती क्षेत्रातील प्रतिनिधींशी त्यांनी आज व्हीडिओ कॉन्फरन्सिंगच्या मदतीने संवाद साधला. या संवाद सत्राला केंद्रीय पंचायतीराज, कृषी आणि शेतकरी कल्याण राज्यमंत्री श्री पुरूषोत्तम रूपाला, प्रदेश भाजपाध्यक्ष चंद्रकांतदादा पाटील, अनिल बोंडे, पाशा पटेल उपस्थित होते. कापूस, सोयाबीन, कांदा, धान, द्राक्ष, ऊस, दाळिंब, संत्रा, काजू, सीताफळ, चणा, दूध उत्पादकांच्या विविध समस्या, आजच्या स्थितीत पीकविमा, शेतमाल खरेदी, कर्जमाफी इत्यादींची स्थिती याबाबत व्यापक आणि सखोल चर्चा यावेळी झाली. कोरोना संकटामुळे आर्थिक गतिविधींचा वेग मंदावला असल्याने यंदाचा शेतीचा हंगाम यशस्वी करण्यासाठी काय उपाय करावे लागतील, याबाबत निरनिराळ्या सूचना उपस्थितांनी दिल्या. हा हंगाम यशस्वी झाला, तर त्यामुळे अर्थव्यवस्थेला मोठी बळकटी मिळणार आहे. यासाठी राज्य सरकारने शेतमालाची खरेदी पूर्ण क्षमतेने यशस्वी करणे याला प्राधान्य द्यायला हवे. जेएनपीटीच्या माध्यमातून आता कंटेनर वाहतूक सुद्धा सुरू झालेली आहे, असे देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले. केंद्रीय मंत्री पुरूषोत्तम रूपाला यांनी यावेळी महाराष्ट्रातील शेतकरी प्रतिनिधींशी ही चर्चा घडवून, त्यांच्या समस्या जाणून घेण्याची संधी दिल्याबद्दल समाधान व्यक्त केले. 'किसान रथ'सारख्या अभिनव संकल्पनांची माहिती यावेळी दिली.

या संवाद सत्रात पुणे विकास संघाचे चंदन पाटील, डॉ. वार्ष्णेय (पुणे), किसान मोर्चाचे भाई मुंडे, आनंद राऊत (उमरेड), वासुदेव काळे (दौंड), हरिभाऊ जावळे (जळगाव), अजय गव्हाणे (परभणी), डॉ. अमोल कोहळे (वरूड), अरविंद नळकांडे (दर्यापूर), तुषार पवार (कराड, सातारा), अतुल काळसेकर (सिंधुदुर्ग), अजित गोगटे (सिंधुदुर्ग), राध्येश्याम मुंगमोडे (साकोली), दत्तात्रय पानसरे (अहमदनगर), शिवनाथ बोरसे (चांदवड), रमेश कोकाटे, अशोक धोटे (नागपूर), जगन्नाथ खापरे, श्याम गट्टाणी (बुलढाणा), नाना आखरे (नागपूर), विलास दहीभाते (जालना), सुनील सूर्यवंशी (चांदूर) इत्यादी प्रतिनिधी सहभागी झाले होते.

गृहमंत्री अनिल देशमुख यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करा

भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रकांतदादा पाटील यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

पालघर जिल्ह्यात पोलिसांच्या साक्षीने दोन साधूंची जमावाकडून हत्या झाल्याची मॉब लिंचिंगची घटना अत्यंत धक्कादायक आणि निषेधार्ह आहे. राज्यात वारंवार कायदा सुव्यवस्थेची समस्या निर्माण होत असून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी गृहमंत्री अनिल देशमुख यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करावी व या घटनांची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष मा. चंद्रकांतदादा पाटील यांनी मंगळवारी केली.

मा. चंद्रकांतदादा पाटील यांनी पालघर जिल्ह्यातील साधूंच्या हत्याकांडाविषयी राज्यपाल, मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना पत्र पाठवले असून त्यामध्ये वरील मागणी केली आहे.

पालघरच्या घटनेची मुख्यमंत्र्यांना सरकारी यंत्रणेकडून तातडीने माहिती मिळाली असेलच. तथापि, याविषयी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी स्वतः विचारणा केली, विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी आवाज उठवला आणि सोशल मीडियावरून या प्रकरणी सरकारची नाचक्की झाली त्यानंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे राज्यातील जनतेशी बोलले. या गंभीर घटनेनंतर मुख्यमंत्र्यांनी तातडीने स्वतः जनतेशी संवाद साधायला हवा होता तरीही त्यांनी चार दिवस वेळ लावला याबद्दल मा. चंद्रकांतदादा पाटील यांनी खेद व्यक्त केला.

त्यांनी म्हटले आहे की, राज्यात गेल्या काही दिवसात गंभीर घटना घडल्या आहेत. ठाण्यात एका तरुणाला एका मंत्र्याच्या बंगल्यात नेऊन मारहाण करण्यात आली. हजारो कोटींच्या गैरव्यवहारात तपास यंत्रणांना हवा असलेल्या आरोपीला राज्याच्या गृहखात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडून लॉकडाऊनच्या काळात सवलत देण्यासाठी पत्र देण्यात आले. लॉकडाऊनमुळे संचारबंदी असताना तसेच चौकाचौकात पोलिसांचा बंदोबस्त असतानाही मुंबईत बांद्रा येथे हजारोंचा जमाव जमला. आता पालघर जिल्ह्यात पोलिसांच्या साक्षीने साधूंचे हत्याकांड झाले. मा. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी या घटनांबद्दल गृहमंत्री अनिल देशमुख यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करून वरील घटनांची निःपक्ष चौकशी करावी, अशी आमची मागणी आहे. ठाणे येथे तरुणाच्या मारहाणप्रकरणी निःपक्ष चौकशीसाठी संबंधित मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी राजीनामा द्यावा या मागणीचा आम्ही पुनरुच्चार करतो.

साधूंच्या हत्याकांडातील गुन्हेगारांवर कठोर कारवाई करावी तसेच घटनास्थळी उपस्थित असूनही साधूंना वाचविण्यासाठी काहीही न करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांवरही कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.

मोदी राष्ट्रनेत्यासारखे बोलले

• डॉ. वेदप्रताप वैदिक

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोरोनाच्या निमित्ताने देशाला तिसऱ्यांदा संबोधित केले. त्यांची भाषा, शैली ही प्रासंगिक आणि प्रेरणादायक होती. त्यांनी योग्य वेळी कोरोना संसर्गापासून बचावासाठी निर्णय घेतला की नाही यावर मतभेद असू शकतात; परंतु जगाच्या अनेक शक्तिशाली देशांपेक्षा कोरोना साथीचा प्रसार भारतात कमी झाला आहे, यात शंका नाही. अनेक सुविधासंपन्न आणि विकसित राष्ट्रांच्या तुलनेत कोरोना संसर्गाची संख्या ही लोकसंख्येच्या प्रमाणात भार-तापेक्षा शंभरपट जास्त आहे. , भारतात संसर्ग इतका का पसरला नाही? यासाठी आपल्या डॉक्टरांची आणि परिचारिकांची सेवा आणि सामान्य जनतेची खबरदारी या गोष्टी कारणीभूत असून सोबतच भारतीय संस्कृतीची जीवनशैलीदेखील याला एक मोठे कारण आहे. कोट्यवधी भारतीय जेव्हा एकमेकांना भेटतात तेव्हा ते हातात हात देण्याऐवजी एकमेकांना अभिवादन करतात, शारीरिक अंतर राखतात, फ्रिजमध्ये ठेवलेले शिळे अन्न खाण्याऐवजी ताजे अन्न खातात, मांसाहारी आणि शाकाहारी पदार्थ जास्त खातात. अन्नामध्ये असे मसाले वापरतात जे रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात. या मसाल्यांच्या सतत वापरामुळे युरोप आणि अमेरिकेत स्थायिक झालेले भारतीय कोरोनाला कमी प्रमाणात बळी पडले आहेत. मोदींनी आयुष मंत्रालयाच्या आयुर्वेदिक शिक्षणाचादेखील उल्लेख केला. काही हिंदी वृत्तपत्रे आणि काही टीव्ही चॅनल्स या घरगुती उपचारांवर आधारित कार्यक्रमांचे प्रसारण करत आहेत. परंतु मी आशा करतो की माध्यमेही कोट्यवधी लोकांना प्रेरणा देतील.

पंतप्रधानांनी ज्या सप्तपदींचा उल्लेख केला आहे ते उत्तम आहे. घरातील वडीलधाऱ्यांची काळजी घेणे, लॉकआऊटमध्ये शारीरिक अंतराकडे लक्ष, मास्क घालणे, आरोग्य सेतू ॲपचा वापर करणे, डॉक्टर, परिचारिका व पोलिसांचा सन्मान करणे इत्यादी बाबींना संबोधित केले. एखाद्या नेत्याच्या तोंडून अशा गोष्टी ऐकल्यामुळे मन:शांती मिळते. मोदींनी भर दिलेल्या इतर दोन गोष्टीही महत्त्वाच्या आहेत. देशात उपाशीटी कुणालाही झोपू देऊ नका आणि गरिबांना अन्न द्या. दुसरे म्हणजे, व्यापारी आणि उद्योगपतींनी कोणत्याही कर्मचाऱ्यांना कामावरून कमी करू नये. पंतप्रधानांची छवी अशी आहे की ते राजकीय पदापेक्षा मोठी उंची गाठतात. या गोष्टीकडेही लक्ष दिले पाहिजे की मागच्या २०-२५ दिवसांत भाजप सरकारने कोरोना संकटाला कोणतेही सांप्रदायिक रूप देण्याचा प्रयत्न केला नाहीये. तबलिगी जमातचे प्रकरण भारतीय मुसलमानांच्या माथी मार ण्याचा प्रयत्नही केला नाहीये. भाजप अध्यक्ष जगतप्रकाश नड्डा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने निजामुद्दीनच्या जमात मेळाव्याला जातीय रंग देण्याच्या प्रकाराला कडाडून विरोध दर्शवला आहे. हीच गोष्ट राजकीय परिपक्वता आणि खऱ्या राष्ट्रवादाचा जिवंत पुरावा आहे.

सरकार, भाजप आणि संघ यांची ही विधायक वृत्ती ही तबलिगी कार्यकर्त्यांना समजू शकलेली नाही. यापैकी अनेक जण घरी लपून बसले असून त्यांना शोधून त्यांच्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टर व परिचारिका यांच्याशी गैरवर्तन करत आहेत. त्यांना माहीत नाही की त्यांच्या मौलानाच्या बेजबाबदारपणामुळे सर्वात जास्त नुकसान त्यांनी त्यांच्याच जवळच्या व्यक्तींचे केले आहे.

आपल्या तिसऱ्या भाषणात मोदींचे राष्ट्रनेता म्हणून नवे रूप समोर आले. विरोधी पक्ष अजूनही अनेक मुद्द्यांवर सरकारचा विरोध करत आहे. परंतु मोदींनी त्यांच्याविरोधात एक शब्दही उच्चारला नाही. विरोधकांचे काम विरोध करणे आहे, परंतु मोदींनी विरोध करण्याऐवजी त्यांच्या सहकार्याची मागणी केली आहे. संकटाच्या वेळी हीच भूमिका महत्त्वाची आहे.

सौजन्य - दिव्य मराठी)

इतर देशांपेक्षा तातडीने हालचाली केल्याने भारताची स्थिती चांगली

▪ ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या अभ्यासातील निष्कर्ष

▪ केंद्र सरकारच्या उपाययोजनांचे कौतुक

नवी दिल्ली : कोरोना विषाणूमुळे पसरलेल्या 'कोविड-१९' या संसर्गजन्य आजाराचा फैलाव सुरू झाल्यानंतर भारताने इंग्लंड, अमेरिका, जर्मनी, इटली, स्पेन, दक्षिण कोरिया या देशांपेक्षा तातडीने हालचाली करून प्रतिबंधक उपाययोजना केल्या, अशा शब्दांत ऑक्सफर्ड विद्यापीठाने आपल्या देशाचे कौतुक केले आहे. विद्यापीठाने यासंदर्भात केलेल्या एका अभ्यासातून हा निष्कर्ष काढण्यात आला आहे.

ही साथ पसरल्यानंतर ती रोखण्यासाठी प्रत्येक देशाने किती तत्परतेने हालचाली केल्या, याचा अभ्यास 'ऑक्सफर्ड कोव्हिड-१९ गव्हर्नमेंट रिस्पॉन्स ट्रॅकर' (ओएक्ससीजीआरटी) यांच्या माध्यमातून करण्यात आला. या अभ्यासासाठी ११ निकष निश्चित करून विद्यापीठाने माहिती गोळा केली. कोरोनाची साथ आल्यानंतर कोणत्या देशाने तातडीने निर्णय घेतले, याचा अभ्यास विद्यापीठाने केला. त्या बाबींमध्ये शाळा व सर्व शिक्षणसंस्था बंद करणे, सार्वजनिक कार्यक्रम रद्द करणे, सार्वजनिक वाहतूक स्थगित करणे, लोकजागृतीसाठी मोहीम हातीघेणे, अर्थव्यवस्था सावरण्यासाठी उपाययोजना करणे, देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय वाहतूक सेवा स्थगित करणे, आरोग्यसेवेसाठी अधिक निधी उपलब्ध करणे, लस निर्मितीसाठी केलेले जोरदार प्रयत्न, लसीच्या चाचणीसाठी केलेल्या सोयी, रुग्णांच्या संख्येवर लक्ष ठेवणे आदी गोष्टींचा समावेश आहे.

'ओएक्ससीजीआरटी' प्रकल्पात सहभागी व ब्लावंटिक स्कूल ऑफ गव्हर्नमेंट येथील सहाय्यक प्राध्यापक थॉमस हेल म्हणाले, 'कोरोना साथ पसरल्यानंतर विविध देशांच्या सरकारांनी किती जलद वा विलंबाने निर्णय घेतले याबद्दल आम्ही केलेल्या अभ्यासाचे निष्कर्ष धोरणकर्त्यांना मार्गदर्शक ठरतील. अशा साथीच्या वेळेस तातडीने व परिणामकारक ठरतील, अशी कोणती पावले उचलायला हवी, हेही या अभ्यासाच्या निष्कर्षांतून लक्षात येते.'

तातडीच्या निर्णयांमुळे उजवी कामगिरीकोरोना साथीचा धोका लक्षात घेऊन भारतात केंद्र सरकारने पहिल्यापासून अतिशय तातडीने निर्णय घेतले. आंतरराष्ट्रीय प्रवासी सेवा स्थगित केली, २१ दिवसांचा लॉकडाऊन पुकारला, राज्याच्या सीमा बंद केल्या. तसेच, १२ लाख लोकांची आतापर्यंत कोरोना विषाणूची लागण झाली की नाही, हे तपासण्यासाठीचाचणी करण्यात आली आहे. अन्य कोरोनाग्रस्त देशांच्या तुलनेत भारताची ही कामगिरी उजवी असल्याचे निष्कर्षात म्हटले आहे.

गोरगरीबांच्या कल्याणाचे पॅकेज

▪ आ. आशिष शेलार

देशाच्या अर्थमंत्री निर्मला सितारामन् यांनी १ लाख ७० हजार कोटींचे पहिले मदतीचे पॅकेज तातडीने जाहीर केले. जे पॅकेज जाहीर करण्यात आले त्यामध्ये उज्वला योजनेत ८ कोटी ३ लाख गरीब महिलांना मोफत सीलेंडर , ८ कोटी ७० लाख शेतक-यांना थेट खात्यात प्रत्येकी २००० हजार रुपये जमा होणार, ८० कोटी गरीबांना तीन महिने मोफत धान्य मिळणार, २० लाख कर्मचारी आरोग्य विम्याचे लाभार्थी, तर ५ कोटी वृध्द आणि दिव्यांगाना थेट एक हजार रूपये अतिरीक्त पैसे खात्यात जमा होणार, ५ कोटी मनरेगाचे लाभार्थी, तर जनधन योजनेतील २० कोटी महिलांना प्रत्येकी ५०० रुपये खात्यात जमा होणार, या शिवाय १५ हजार रूपयांच्या खाली उत्पन्न असलेल्या ईपीएफ रक्कम सरकार जमा करणार अशा घोषीत करण्यात आले.

केंद्राने केवळ घोषणा केली असे नाही तर तातडीने अंमलबजावणीसाठी सर्व शासकीय प्रक्रिया पुर्ण करुन थेट लाभार्थ्यांना त्याचा फायदा तातडीने कसा होईल या दुष्टीने काम सुरु केले. २६ मार्चला या पॅकेजची घोषणा केली तर केंद्र सरकारने अधिकृत माहिती १२ एप्रिल २०२० जी जाहीर केली म्हणजे अवघ्या पंधरा दिवसाच्या आत पॅकेजमधील बहुतांश निधी आणि धान्य लाभार्थ्यांना पोहचले. उज्वला योजनेतील ७.१५ कोटी लाभार्थ्यांना ५,६०६ कोटी रुपये हस्तांतरीत केले गेले आहेत. त्यापैकी ८५ लाख सिलेंडरचे वितरण झाले. पंतप्रधान मदत योजनेतील ३१ कोटी ७७ लाख लाभार्थ्यांना २८ हजार २५६ कोटी रुपयांची थेट आर्थिक मदत खात्यात जमा केली आहे. यामध्ये जनधन योजनेतील ९७% म्हणजे १९.८६ कोटी महिला खातेदारांना ९९३० कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत. तर ६.९३ कोटी शेतकरी खात्यात १३, ८५५ कोटी जमा करण्यात आले आहेत. विधवा महिला व दिव्यांग असलेल्या २.८२ कोटी लाभार्थ्यांना १४०५ कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत तर २.१६ कोटी बांधकाम व अन्य कामगारांना ३०६६ कोटी रुपये अदा करण्यात आले आहेत, ही झाली देशाची स्थिती. आता आपण यातील महाराष्ट्राला किती मिळाले तेही पाहू या.

महाराष्ट्राची प्रधानमंत्री किसान योजना लाभार्थी संख्या ८४,०३,६०८ असून त्यांना थेट खात्यावर रु. १,६८,०७२.१६ लक्ष जमा झाले तर प्रधानमंत्री जनधन योजना खातेदार संख्या १,३६,३८,२७८ असून १,२९,०३,३४८ खातेदारांच्या अकाउंट मध्ये प्रत्येकी रु. ५०० रुपये प्रमाणे प्रधानमंत्री जनधन योजना खात्यांमध्ये रु. ६४,५१६.७४ लक्ष जमा झाले..तर राष्ट्रीय सामाजिक सहायता कार्यक्रम (छड-झ) अंतर्गत प्रत्येकी रु. ५०० असे एकूण ५८४१.९३ लक्ष खातेदारांच्या अकाउंट मध्ये जमा या योजनेचे लाभार्थी संख्या ११,६८,३८५ आहे तसेच इमारत व इतर बांधकाम कामगार मंडळ च्या एकूण १२,१८,००० लाभार्थ्यांना एकूण ३०,४५० लक्ष मदत जमा झाली तर ६३,६४८ ईपीएफओ कामगार

लाभार्थ्यांना एकूण रु. २०,३४४.७१ लक्ष जमा झाले या सर्वातून एकूण रु. २,८९,२२५.५४ लक्ष महाराष्ट्रातील लाभार्थ्यांना मिळाले.

तर केंद्र सरकारच्या वित्त विभागाने एप्रिल महिन्याचा राज्यांना देय असलेला हिस्सा ही अदा केला असून देशातील सर्व राज्यांना ४६०३८.७० कोटी रुपये देण्यात आले त्यामध्ये महाराष्ट्राला आपल्याला २८२४.४७ कोटी रुपये मिळाले आहेत. तसेच राज्यांसाठी सहाय्यता निधी ही केंद्राने देण्यास सुरुवात केली असून १४ राज्यांना ग्रँड स्वरूपात तर स्टेट डिझास्टर रिस्क मॅनेजमेंट फडांतून ११,०९२ कोटी देण्यात येणार असून त्यातील महाराष्ट्राचा हिस्सा ही मिळेलच.या शिवाय अन्य मदत जी केंद्र सरकारने करणे आवश्यक आहे तीही सरकार करते आहे. शिवाय गेल्या दहा दिवसात आयकर परताव्यातून ५२०४ कोटी रुपये ८.२ लाख छोट्या प्रोप्रायटरी फर्म, छोटे व्यवसायीक यांना देण्यात आला. त्यातूनही पुणे मुंबई सारख्या क्षेत्रात निधी आला आहे. शिवाय नाबार्डला रिझर्व्ह बँकेकडून ५०,००० कोटी आणि नॅशनल हौसिंग बँकेला २५ ००० कोटी हा जो निधी येणार आहे त्यातील महाराष्ट्रातील हौसिंग आणि शेती या क्षेत्राला गती मिळणार आहे. या दोन्ही क्षेत्रात महाराष्ट्र अग्रगण्य असल्याने त्याचा फायदा राज्याच्या अर्थव्यवस्थेला होईलच. मोटर रजिस्ट्रेशन, आरोग्य विमा यासारख्या गोष्टींना ज्या सवलती मिळाल्या त्याही फायदेशीरच ठरणाऱ्या आहेत.

अजुन काही मार्गाने राज्याचा जो हिस्सा आहे तो राज्यांना मिळेल काही मागण्या बाकी असतील तर त्यावर सरकार काम करीत असेल. हे अचानक आलेले संकट जसे वैयक्तीक रित्या प्रत्येक व्यक्तीचे नुकसान करुन करुन जाणार आहे तसेच ते राज्य आणि देशाचे ही मोठे आर्थिक नुकसान करणार आहे. जशी राज्याची आर्थिक स्थिती अडचणीची आहे तशीच देशाची तिजोरी ही अडचणीतच आहे. त्यामुळे केंद्राने महाराष्ट्रसह सर्व राज्यांना दिलेली मदत ही पुरेशी आहे असे मला म्हणायचे नाही. केंद्र आणि राज्यामध्ये हे आदान-प्रदान वर्षभर सुरु राहते. तसेच ते सुरु राहिलं आपल्या राज्याला अधिकची मदत मिळावी असे आमचेही

मत आहे. त्याबद्दल कुणाच्या मनात शंका असण्याचे कारण नाही. एकिकडे महसुलात अचानक झालेली घट, महसूल जमा होण्याचे एकाकी बंद झालेले मार्ग यामुळे राज्यासमोर जशा अडचणी आहेत तशाच त्या केंद्र सरकार समोर ही आहेत. अशावेळेस मोठा निधी उभा करणे हे आव्हान आहे ते आव्हान स्विकारुन पंतप्रधान आणि केंद्र सरकार काम करते आहे. त्यामुळे जसजसा महसूल वाढेल तसे चित्र बदलू लागेल.

या सगळ्या गोष्टींचा उहापोह करण्या मागे हेतू एवढाच की महाराष्ट्रातील राज्यकर्ते वारंवार राज्याची रिकामी तिजोरी दाखवून महाराष्ट्राला काहीच मिळाले नाही हे जे सांगत आहेत तसे वास्तविक चित्र नाही. राज्यात तिन पक्षांचे सरकार आल्यापासून बुलेटट्रेन, मेट्रो, हायपर लूप अशा प्रकल्पांना बंद करणे किंवा स्थगिती देण्याचा सपाटा सुरु झाला त्यातून नकारात्मक चित्र राज्याचे उभे राहते की काय, अशी भिती आहे. असे वातावरण तयार झाले तर येणाऱ्या गुंतवणूकीवर त्याचा परिणाम होऊ शकतो. राज्याला केंद्राकडून जरुर अधिकचे मिळणे आवश्यक आहे त्यामुळे अधिकची मागणी करणे गैर नाही, तो राज्यांचा हक्क ही आहे.

पारंपरिक मदतीच्या पध्दती केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने बदलल्या आहेत. योजनांचे सक्षम जाळे पंतप्रधानांनी उभे केले व गरिबाच्या मदतीमध्ये जी गळती होती ती बंद केली. आज दिल्लीतून देण्यात आलेला प्रत्येक रुपया लाभार्थ्यांना थेट बँक खात्यात मिळतो आहे. त्यामुळे त्यातील विलंब कमी झाला गळती तर कमी झाली तशीच फाईलचा सरकारी प्रवास ही कमी झाला. हा निधी राज्यांच्या तिजोरीत येत नाही थेट लाभार्थ्यांना मिळतो त्यामुळे तो राज्याने मोजू नये असे नाही. भले तो राज्याच्या तिजोरीत आला आणि गेल्याचा दिसत नसला तरी ज्याला द्यायचा आहे त्याला मिळतो आहेच ना ? हा आता एक गोष्ट होते हे आपण दिले हे जे समाधान राज्याच्या राज्यकर्त्यांना मिळाले असते ते मिळत नाही. पण गरिबाला मिळते आहे याचे समाधान आईच्या काळजाप्रमाणे मान्य करायला काय हरकत आहे. उगाच सावत्र आई प्रमाणे आपल्या हातून हे पुण्य कर्म झाले नाही म्हणून हे पुण्य कर्म नाही अशी कुरबुर करण्यात काय अर्थ आहे. पुर्वी कधीतरी कोण्या एका काळी धारावीच्या विकासाला शंभर कोटी रुपये देऊ अशी त्यावेळच्या केंद्र सरकारने घोषणा केली आणि ती हवेत विरली.

२६ जुलैच्या मुंबईतील प्रलयानंतर मिठी नदीवर उभे राहुन ब्रिमस्टोवँडसाठी त्यावेळच्या केंद्र सरकारने हजारो कोटींची घोषणा केली आणि वर्षानुवर्ष महापालिकेला केंद्रासमोर हात पसरावे लागले असेल तर परिस्थिती आज राहिलेली नाही. जे घोषित होते ते थेट तातडीने लाभार्थ्यांना मिळते मग यात चिंता करावी असे काही नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सरकार स्थापन केल्यावर राज्यांना मिळणारा वाटा हा पुर्वीच्या सरकारमध्ये ३२ड्ड होता तो ४२ टक्के केला. योजनांतून पैसा पुर्वी राज्यांना यायचा आज ती पध्दत बदलून राज्यांना अधिकार दिले. पंचायतीला थेट निधी देऊन पंचायत राज व्यवस्था बळकट केली. यामध्ये गैर काय? थेट लाभार्थ्यांना पैसा जातो ही काहीजणांना अडचण का वाटतेय?

असो, आज आपण ज्या परिस्थितीतून मार्ग काढत आहोत तो काळ भयंकर अडचणींचा आहे. आज पंतप्रधानांनी स्पष्ट केले आहेच जान भी और जहान भी..! संघर्ष तर सगळ्यांनाच करायचा आहे. आपण तो.सगळे मिळून करीत आहोत आणि करु याबाबत चिंता नाही. पण या काळात वारंवार राज्यातील आर्थिक परिस्थिती वरुन जी राज्यकर्त्यांची जी विधाने येत आहेत. ती चिंता वाटणारी आहेत. महाराष्ट्र हा देशाला आणि जगाला दिशादर्शक असाच कामगिरी करणारा प्रदेश आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या युध्दनिती आणि राज्यकारभारात हा जगाचा अभ्यासाचा, कुतूहलाचा आणि आदर्शाचा विषय आहे. तसेच महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे तर जगाचे भाग्यविधाते ठरले. त्याच महाराष्ट्राकडे आज स्वाभाविकपणे जगाचे लक्ष राहणार आहे. अशावेळी चुकीची दिशा दर्शविणारी, काही वेळा निराशा वाढविणारी, तर कधी केंद्र सरकारकडे केवळ बोट दाखवणारी जी विधाने येतात. त्यामुळे चुकीचे नॅरेशन महाराष्ट्राचे सेट होते आहे.अशावेळी कुणीतरी यातील सत्य मांडणे आवश्यक आहे. त्यामुळे हा अक्षरप्रपंच करुन मी प्रयत्न केला. ज्यामधे हेतू ऐवढाच महाराष्ट्र धर्म जपावा... महाराष्ट्र धर्म वाढवावा.

महाराष्ट्रात उज्वला लाभार्थींना

११ लाखाहून अधिक एलपीजी सिलेंडरचे वाटप

इंडियन ऑइलने इतर तेल विपणन कंपन्यांच्या सहयोगाने महाराष्ट्रात उज्वला (पीएमयुवाय) लाभार्थींना, प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेअंतर्गत (पीएमजीकेवाय) आतापर्यंत ११ लाखाहून अधिक एलपीजी सिलेंडरचे मोफत वाटप केले.

तेल विपणन कंपन्या आपल्या एलपीजी वितरकांमार्फत लाभार्थीपर्यंत पोहोचत असून एप्रिल,मे आणि जून २०२० मधे, वाटप करण्यात येत असलेल्या मोफत एलपीजी सिलेंडरचा लाभ लाभार्थी घेत आहेत हे सुनिश्चित करत आहेत.

मोफत रिफिलअर्थात पुनर्भरण करण्यासाठीची आगाऊ रक्कम म्हणून तेल विपणन कंपन्यांनी महाराष्ट्रातल्या ३९.८४ लाख (२९६ कोटी रुपये) प्रधान मंत्री उज्वला योजनेच्या लाभार्थींच्या खात्यात हस्तांतरित केली आहे. यापैकी ९.७८ लाख प्रधान मंत्री उज्वला योजनेच्या लाभार्थींच्या खात्यात ७२ कोटी रुपये एकट्या इंडियन ऑईलने जमा केले आहेत.

राज्यात एप्रिल महिन्यासाठी प्रधान मंत्री उज्वला योजनेच्या लाभार्थीकडून आतापर्यंत १३ लाख रिफीलसाठी नोंदणी झाली.त्यापैकी ११ लाख सिलेंडर पोहोचवण्यात आले आहेत.

कोविड-१९ विरोधातला लढा देण्यासाठी देशभरात लॉक डाऊन सुरु असून प्रधान मंत्री उज्वला योजनेच्या लाभार्थींना सहाय्य करण्यासाठी प्रधान मंत्री गरीब कल्याण योजने अंतर्गत, इंडियन ऑईल आणि इतर तेल विपणन कंपन्यांच्या सहयोगाने योजना राबवण्यात येत आहे.केंद्रीय वित्तमंत्री निर्मला सीतारामन यांनी २६ मार्चला गरिबांसाठी जाहीर केलेल्या १.७२ लाख कोटी रुपयांच्या मदत पॅकेजचा हा भाग आहे.

या योजनेंतर्गत प्रधान मंत्री उज्वला योजनेच्या लाभार्थींना एप्रिल ते जून २०२० या काळासाठी १४.२ किलो एलपीजी सिलेंडरचे तीन रिफील किंवा ५ किलो सिलेंडरचे आठ रिफील मोफत करण्यात येत आहेत.

इंडेन एलपीजी रीफिल्साठी नोंदणी केल्यानंतर रिफीलसाठी लागणारी रक्कम इंडियन ऑईलकडून थेट माझ्या खात्यात जमा झाली.इंडेन एलपीजी कडून आज माझ्या घरी रिफील सिलेंडर पोहोचला. गरज लक्षात घेऊन विचारपूर्वक केलेल्या या मदतीबद्दल आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इंडियन ऑईलची आभारी असल्याची भावना महाराष्ट्रातल्या यवतमाळ जिल्ह्यातल्या प्रधानमंत्री उज्वला योजनेच्या लाभार्थी जयश्री डोंबले यांनी व्यक्त केली.

पंतप्रधान मोदी यांनी साधला भाजपाच्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांशी दूरध्वनीवरून संवाद

भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ कार्यकर्ते आणि माजी प्रदेश कार्यालय सचिव मुकुंदराव कुलकर्णी यांना २४ एप्रिल रोजी सकाळी मोबाईलवर अनोळखी क्रमांकावरून फोन आला. पलिकडच्या माणसाने मुकुंदरावच बोलत आहेत याची खात्री केली आणि सांगितले, फोन डिसकनेक्ट मत किजीये, प्रधानमंत्री आपसे बात करना चाहते है ! मुकुंदराव कुलकर्णी यांना आश्चर्याचा धक्का बसला. देशाचे पंतप्रधान आपल्याशी काय बोलतील अशा विचारात ते पडले असतानाच पलिकडे फोन जोडला गेला आणि आश्वासक आवाज ऐकू आला, मुकुंदराव कैसे हो ?

कोरोनाच्या जागतिक साथीच्या संकटाचा सामना भारतही करत आहे. या गंभीर परिस्थितीतही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वेळात वेळ काढून आपल्यासारख्या कार्यकर्त्याला फोन करून विचारपूस करावी, हा अनुभव विलक्षण होता.

आपण घरी असाल म्हणून तुमची चौकशी करण्यासाठी फोन केला. तुमच्या सारख्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी चाळीस – चाळीस वर्षे पक्षाचे काम केले आहे, हे कधी विसरता येणार नाही. देशावर कोरोनाचे संकट आहे, पण आपल्याला त्यातून देशाला बाहेर काढायचे आहे. स्वतःची काळजी घ्या, कुटुंबाची काळजी घ्या, असे मा. मोदीजी मुकुंदराव कुलकर्णी यांना म्हणाले.

अनपेक्षितपणे पंतप्रधानाचा फोन आल्यामुळे आणि त्यांनी कोरोनाच्या संकटकाळात आपुलकीने चौकशी केल्यामुळे मुकुंदरावांना आनंद झाला आणि भरूनही आले. त्यांनी जनसंघाच्या काळापासून पक्षाचे काम केले आहे. भाजपाच्या स्थापनेसाठी १९८० साली मुंबईत पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन झाले त्यावेळी त्या अधिवेशनाच्या व्यवस्थेत ते पक्षाचा पदाधिकारी म्हणून सहभागी होते. दिवंगत माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्याशी त्यांचा परिचय होता. श्रद्धेय अटलजी त्यांच्या घरी आले होते. माजी उपपंतप्रधान लालकृष्ण अडवाणींचा स्नेह त्यांना लाभला. कार्यालय सचिव म्हणून भाजपा प्रदेश कार्यालयाची जबाबदारी त्यांनी दीर्घकाळ सांभाळली. त्यानंतर सध्या ते प्रदेश कार्यालयाच्या ग्रंथालय आणि डॉक्युमेंटेशन विभागाची जबाबदारी सांभाळत आहेत. मा. मोदीजींशी पूर्वी परिचय झाला होता. परंतु, २०१४ साली ते पंतप्रधान झाल्यानंतर कधीही संपर्क आला नाही. अचानक त्यांचा फोन यावा आणि त्यांनी आवर्जून पक्षाच्या जेष्ठ कार्यकर्त्याची कोरोनाच्या संकटात विचारपूस करावी, हा अनुभव थक्क करणारा होता.

देशावर कोरोनाचे भयानक संकट आले तरी पंतप्रधान नरेंद्र मोदी डगमगले नाहीत. ते ठामपणे निर्णय घेत आहेत आणि प्रभावी कारवाई करत आहेत. विविध समाज घटकांशी बोलत आहेत. लोकांना त्यांचा भरवसा वाटतो. मुकुंदराव यांनी मोदीजींना आवर्जून लोकभावना सांगितली. अवघ्या दोन मिनिटांच्या या संभाषणामुळे आयुष्यभर जपावा असा आठवणीचा ठेवा त्यांना मिळाला.

सांगली जिल्ह्यात मास्क, सॅनिटायझरचे वाटप

सांगली विधानसभा मतदार संघातील नांद्रे, कर्नाळ आणि पद्माळे या गावांमध्ये कोरोना विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी आमदार सुधीरदादा गाडगीळ युवा मंचच्या वतीने मास्क, सॅनिटायझर आणि जंतूनाशक फवारणीचे औषध वाटप करण्यात आले. यावेळी आमदार सुधीर गाडगीळ यांनी तीनही ग्रामपंचायतींना भेट देऊन त्यांच्या कामकाजाची माहिती घेतली.

यावेळी पद्माळेचे सरपंच सचिन जगदाळे,मिलिद पाटील विलास पाटील कर्नाळ सरपंच मुमताज मुजावर, उपसरपंच राहुल कांबळे, गजानन पाटील, शिवाजी पाटील, केशव पाटील, विशाल वाघमोडे, चंद्रकांत पाटील, बाळकृष्ण मोहिते, नांद्रेचे सरपंच दिपाली नांद्रेकर, पंचायतसमिती उपसभापती राहुल सकळे, सुरेश पाटील, किरण पाटील, नेमगोंडा पाटील, मोसीन मुल्ला व आमदार सुधीरदादा गाडगीळ युवा मंचचे विश्वजीत पाटील तसेच सर्व गावाचे तलाठी, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका तसेच नागरिक व भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.

कोरोनाविरोधीत लढ्यात 'एक राष्ट्र' हीच भावना मोठे यश देईल : देवेंद्र फडणवीस

हिंदू इकॉनॉमिक फोरम, मुंबईच्या वतीने 'कोविडपश्चात काळात भारतीय अर्थव्यवस्था' या विषयावर त्यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते, त्यात ते बोलत होते. भारताकडे सक्षम अशी रिझर्व्ह बँकेसारखी शीर्षस्थ संस्था, बाजारात मागणी निर्माण करण्याची गरज, व्यावसायिकांना लागणारे भांडवल अशा अनेक विषयावर त्यांनी मत व्यक्त केले आणि कार्यक्रमात डिजिटल माध्यमातून उपस्थितांच्या प्रश्नांना उत्तरे सुद्धा दिली. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, कोविडमुळे सर्वाधिक फटका अमूक एखाद्या क्षेत्राला बसेल, असे समजण्याचे काहीच कारण नाही. सर्वच क्षेत्रं यामुळे प्रभावित होणार आहेत. पण, त्याचवेळी अशी संकटं अनेक नवीन संधी सुद्धा निर्माण करीत असतात. त्याकडे आपल्याला लक्ष केंद्रीत करावे लागेल. एक राष्ट्र म्हणून भावना ठेवत या समस्येवर आपण निश्चितपणे मात करू शकू.

या संकटावर मात करण्यासाठी ❊लॉकडाऊन आणि सोशल डिस्टन्सिंग हे एकमेव शस्त्र आपल्याकडे उपलब्ध आहे. हे ओळखून आपल्याला या परिस्थितीत जगण्याची सवय आता करून घ्यावी लागेल. गरज ही शोधाची जननी असते. त्यामुळे या परिस्थितीची सवय करीत आर्थिक गतिविधी पुन्हा सुरू करण्यासाठी अनेक नाविन्यपूर्ण पर्यायांचा शोध प्रत्येकाला घ्यावा लागणार आहे. यातून अर्थव्यवस्था सुरळीत करण्यात प्रत्येकाला योगदान देण्याची संधी आहे. संघटित आणि असंघटित अशा दोन्ही क्षेत्रात रोजगार सुरक्षित राहतील, याची काळजी आपल्याला घ्यावी लागेल. गुंतवणूकदार येतात, तेव्हा ते देशाची, राज्याची आर्थिक स्थिती ही ज्या काही मापदंडांच्या आधारावर तपासत असतात, ते राखण्याचेही आव्हान आपल्यापुढे असेल, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

भाजपा अल्पसंख्यक आघाडीशी संवाद रमजानचा पवित्र महिना सुरू झाल्यानंतर भाजपा अल्पसंख्यक आघाडीच्या पदाधिकार्यांशी सुद्धा देवेंद्र फडणवीस यांनी संवाद साधला आणि सर्वांना रमजानच्या शुभेच्छा दिल्या. अल्पसंख्यक मोर्चाचे कार्यकर्ते सुद्धा आज कोरोनाच्या काळात सर्वांना मदतीसाठी तत्पर असल्याबद्दल त्यांची प्रशंसा केली. अल्पसंख्यक समुदायाला रेशनचे धान्य न मिळणे, घरकाम करणार्या घरेलू कामगारांच्या समस्या, डायलिसीस आणि केमोथेरपी यासारख्या उपचारांकडे सुद्धा प्राधान्याने लक्ष देण्याची गरज असे अनेक मुद्दे यावेळी उपस्थितांनी मांडले. रमजानच्या महिन्यात कोणताही गरजू मदतीविना वंचित राहणार नाही, याची काळजी घेण्याचे आवाहन देवेंद्र फडणवीस यांनी शेवटी केले.

मुंबईत कोरोनाचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढण्याला जबाबदार कोण? - आ. अतुल भातखळकर

कांदिवली पूर्व येथील अवघ्या ३२ वर्षाच्या तरुणाचा ऊेंळव-१९ ने मृत्यू झाल्यानंतर सुद्धा त्याच्या मृत्यूची नोंद अद्या-पावेतो महानगरपालिकेकडे न करण्याचा अक्षम्य हलगर्जीपणा महानगरपालिकेच्या माध्यमातून करण्यात आल्याचा आरोप आमदार श्री. अतुल भातखळकर यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवून केला आहे.

२० एप्रिलला रात्री साडेनऊ वाजता या तरुणाचा ऊेंळव-१९ मुळे मृत्यू झालेला असताना सुद्धा अद्यापावेतो याच्यानंतर जो प्रोटोकॉल असतो त्या प्रोटोकॉल प्रमाणे कुठलीही पावलं उचलणे तर सोडाच पण कालपर्यंत त्याच्या मृत्यूची माहिती तो राहत असलेल्या आर साऊथ वॉर्डातल्या अधिकाऱ्यांना बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा सेंटर मधून कळवली गेली नव्हती. त्यामुळे हा तरुण ज्या वस्तीत राहत होता त्याच्याबरोबर कॉन्टॅक्टमध्ये आलेले सर्व लोक, त्याच्या घरातले लोक आजही त्या ठिकाणी राहत आहेत आणि त्यामुळे या भागात सुद्धा कोरोंनाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असल्यामुळे स्थानिक रहिवाशांच्या मनात प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ऊेंळव-१९ मुळे होणारे मृत्यूचे आकडे लपवण्याकरताच हा प्रकार आणि अक्षम्य हलगर्जीपणा जाणीवपूर्वक केला गेला आहे असा आरोप ही श्री. भातखळकर यांनी आपल्या या पत्रात केलेला आहे. आता तरी तातडीने मृत व्यक्ती ज्या घरात ज्यांच्याबरोबर राहत होता त्यांचं टेस्टिंग करून त्यांना विलगीकरण कक्षात ठेवण्याची आवश्यकता आहे त्यासंदर्भात आपण तातडीने कार्यवाही करावी तसेच यासंदर्भात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणीही भातखळकर यांनी मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात केली आहे.

कोरोना विरुद्धचा लढा; भारताचे जगभरात कौतुक

भारत करोना विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी करत असलेल्या प्रयत्नांचे जागतिक स्तरावर कौतुक होत आहे. स्वित्झर्लंडने काही दिवसांपूर्वी आल्प्स् पर्वतरांगांमधील १४ हजार फूट उंच पर्वतावर लेझर किरणांद्वारे भारताचा नकाशा तिरंग्याच्या रंगात दाखवून भारताला अनोखी मानवंदना दिली.

करोनाच्या विरोधात अवघ्या जगातील छोटे मोठे सर्वच देश संघर्ष करत आहेत, मात्र यामुळे अर्थव्यवस्था थांबवण्याची हिंमत अमेरिकेसह ब्रिटन, इटली या देशांनी केली नाही, लोकांचा मृत्यू झाला तरी चालेल; पण संपूर्ण देशात लॉकडाऊन करायचा नाही, अशी

भूमिका या देशांनी घेतली, याउलट भारताने केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केवळ देशातील एका राज्यात किंवा शहरात लॉकडाऊन जाहीर केला नाही तर संपूर्ण देश बंद ठेवला, जान है तो जहान है, लोकांचे प्राण वाचले पाहिजेत, अशी भूमिका घेतल्याने भारतात करोनाचा संसर्ग नियंत्रणात आहे, त्यामुळेच जगभरात भारताचे कौतुक होत आहे.

भारत देशांतर्गत करोनाचा संसर्ग रोखण्यासाठी प्रयत्न करण्यासमवेत जगातील अनेक देशांना औषधांचाही पुरवठा करत आहे. भारताने हायड्रोक्सीक्लोरोक्वीन या औषधाचा पुरवठा जगातील १३ देशांना केला आहे. अमेरिका, ब्राझिल, इस्रायल या देशांनी भारताने संकटकाळात केलेल्या सहाय्याविषयी आभार मानले आहेत. अमेरिका, इंग्लंड ते युगांडापर्यंतच्या ५५ देशांना भारत हे औषध पुरवणार आहे. भारत हायड्रोक्सीक्लोरोक्वीनचा सर्वांत मोठा उत्पादक देश आहे आणि प्रतिवर्षी ५०० कोटी रुपयांच्या औषधाची निर्यात केली जाते. जगातील हायड्रोक्सीक्लोरोक्वीन उत्पादनापैकी एकट्या भारताचा वाटा ७० टक्के आहे.

करोनाच्या संकटात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जगातील अनेक देशांशी संपर्क साधला आणि या लढ्यात त्यांच्या पाठीशी असल्याचे सांगितले. मार्चमध्ये पंतप्रधान मोदी यांनी दक्षिण आशियाई सहकार संघटना (सार्क) देशांसाठी कोरोना विषाणूच्या संकटाविरुद्ध निधीची घोषणा केली आणि १० लाख डॉलर्स देण्याचे घोषित केले. काश्मीरविषयी पाकिस्तानला उघडपणे समर्थन करणारे तुर्कस्तान आणि मलेशिया यांनीही भारताला हे औषध पाठवण्याची विनंती केली आहे. दोन्ही देशांशी भारताचे मुत्सद्दी संबंध काही काळासाठी तणावपूर्ण बनले होते. कदाचित यापुढे दोन्ही देश पाकची बाजू घेऊ शकणार नाहीत; मात्र मानवतेच्या दृष्टीने भारताने त्यांना साहाय्य केले आहे. भारताच्या या प्रयत्नांमुळे जगातील भारताचे स्थानही बळकट होत चालले आहे. चीन जगात सर्वांत अधिक श्वसनयंत्रे आणि 'पी.पी.ई. किट्स' बनवतो, तर भारत सर्वांत अधिक प्रमाणात स्वस्त अशी 'जेनेरिक' औषधे बनवतो. मागील काही वर्षांमध्ये भारताने सर्वांत स्वस्त औषधे बनवून ती जगाला निर्यात केली आहेत. त्यामुळे जगभरात कमी खर्चात लोकांवर उपचार होत आहेत. भारत नेहमी गरजूंना सहाय्य करत आला आहे. एच.आय.व्ही. सारख्या आजाराविरुद्ध आफ्रिकेला औषधे पाठवून लाखो लोकांचा जीव भारताने वाचवला आहे. भारत पैसा कमावण्यासाठी नव्हे, तर जगाला सहाय्य होण्याच्या दृष्टीने कृती करतो, हे जगाला आता अवगत होत आहे.

करोना विषाणूचा संसर्ग जगभर होऊ लागल्यावर विदेशातील एका विचारवंताने 'भारत या विषाणूचा सामना कसा करतो, हेच मला पहायचे आहे', असे कुत्सितपणे वक्तव्य केले होते. 'बीबीसी'ने भारताच्या उपाययोजनांवर उपहासात्मक व्यंगचित्र दाखवून भारताचा अवमान केला होता. अशा परिस्थितीतही भारताने उपलब्ध साधनसामुग्री आणि योग्य निर्णय घेत बर्यापैकी करोनावर नियंत्रण मिळवले होते; मात्र एक दुर्घटना म्हणा की षड्यंत्र म्हणा तबलिगी जमातचा कार्यक्रम झाला अन् देशभर करोनाचा अतिवेगाने संसर्ग झाला. जेथे या आजाराचे नावही नव्हते, त्या राज्यांमध्ये अनेक पटींनी बाधितांची संख्या वाढली. तरीही ही साथ आटोक्यात आणण्यासाठी सरकारी यंत्रणा लढा देत आहे. भारताला नावे ठेवणार्यांच्या डोळ्यांमध्ये भारतावर आंतरराष्ट्रीय नाणेनिधीसह अनेक देशांकडून होत असलेल्या कौतुकाच्या वर्षावाद्वारे अंजनच घातले गेले आहे. एवढेच कशाला भारताविरुद्ध आतंकवादाचा एककलमी कार्यक्रम राबवणारा पाकही भिकेचा कटोरा घेऊन भारताकडे औषधांचे सहाय्य मागत आहे. ■

बिल गेट्स यांच्याकडून पंतप्रधान मोदींचं कौतुक!

जगातील प्रसिद्ध उद्योजक आणि मायक्रोसॉफ्ट कंपनीचे संस्थापक बिल गेट्स यांनी कोविड-१९शी लढण्यासाठी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केलेल्या उपाययोजनांचं कौतुक केलं आहे. यासंदर्भात बिल गेट्स म्हणाले की, 'पंतप्रधान नरेंद्र मोदींनी वेळीच केलेल्या उपाययोजना आणि कठोर निर्णयांमुळेच भारतातील कोरोनाचं संक्रमणातील दरात घट दिसत आहे, जे संपूर्ण जगासाठी एक उदाहरण आहे. बिल गेट्स यांनी नरेंद्र मोदींना एक पत्र लिहिलं आहे. याच पत्रातून त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

बिल गेट्स यांनी आपल्या पत्रामध्ये म्हटलं आहे की, 'आम्ही तुमचं नेतृत्व आणि तुमच्या व सरकारच्या वतीने करण्यात आलेल्या उपाययोजनांचं कौतुक करतो. ज्यांमुळे भारतावरील कोरोनाचा प्रादूर्भाव कमी आहे.'

राळेगाव विधानसभा क्षेत्रात आमदार प्रा.डॉ. अशोक उईके यांच्या सूचनेनुसार आदिवासी अतिदुर्गम पाड्यावर, तांड्यावर गरजू कुटुंबाना भाजपा महिला आघाडीच्या माध्यमातून अन्न धान्य वितरीत करण्यात येत आहे.

भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत दादा पाटील यांचे वतीने पुण्यातील आरोग्य सेवकांना संरक्षणार्थ पीपीई किट्सचे वाटप करण्यात आले. यामुळे कोरोना विषाणू विरुद्धच्या लढ्यात वैद्यकीय कर्मचाऱ्यांना काम करणे अधिक सुलभ होईल.

सेवाकार्य

शेतकरयांनी कष्टाने पिकवलेल्या फळांना कोरोनामुळे बाजारपेठ ऊपलब्ध होत नव्हती, ही बाब लक्षात घेऊन आ. श्वेताताई महाले यांनी अध्यक्ष असलेल्या तोरणा महिला अर्बन को ऑप सोसायटी तर्फे शेतकरयांची फळे खरेदी करुन मदारसंघातील प्रत्येक गावातील गरोदर माता यांना फळ वाटप करण्याचा संकल्प केला असून,याचा शुभारंभ मौजे उंद्री व मौजे साखळी बु. येथून केला.

सातारा जिल्ह्यातील मौजे पाल (खंडोबाची) येथील भाजपा जेष्ठ नेते सुरेशतात्या पाटील यांनी स्वतः स्वकष्टाने पिकवलेल्या शेतातील १० पोती (१० क्विंटल) धान्य पालमधील दलीत वस्ती येथे तसेच गरीब व गरजू कुटुंबियांना मोफत वाटप केले.

त्र्यंबकेश्वर येथील साधु संतांना भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी शिधा वाटप केला. संघटनमंत्री किशोर काळकर,जिल्हाध्यक्ष केदा नाना आहेर,जिल्हा उपाध्यक्ष अँड श्रीकांत गायधनी,सुनिल बच्छाव यांच्या मार्गदर्शनानुसार हा कार्यक्रम राबविण्यात आला.

बारामती येथे प्रशांत (नाना) सातव मित्र परिवार यांच्यावतीने जगताप मळा, साठे नगर, जाधव वस्ती, फलटण रोड, कारभारी नगर, कसबा-बारामती भागात एकूण १००० कुटुंबांना मोफत भाजी देण्यात आली...

- उस्मानाबाद येथील धान्यवाटप...

प्रदेश सरचिटणीस आमदार सुजितसिंह ठाकुर, आमदार राणा जगजितसिंहजी पाटिल यांच्या मार्गदर्शनाखाली उस्मानाबाद येथे विजय नाना दंडनाईक मित्र मंडळाच्या वतीने जीवनावश्यक वस्तूंच्या ७०० कीटचे वाटप करण्यात आले.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी लॉकडाऊनच्या काळात साधला १.५ कोटी लोकांशी संवाद

भारतामध्ये कोरोनाचे संकट आले असतांना लॉकडाऊनच्या काळामध्ये चिंताग्रस्त असलेले, प्रसारमाध्यम प्रतिनिधी तसेच विद्यार्थी अशा १.५ कोटी समाज घटकांसोबत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीने व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून केंद्रीय रस्ते, वाहतूक महामार्ग मंत्री आणि केंद्रीय सुक्ष्म, लघू व मध्यम उद्योगमंत्री नितीन गडकरी यांनी लोक-संवाद साधला आहे. या दरम्यान त्यांनी या सर्व समाज घटकांच्या समस्या ऐकून घेतल्या

तसेच उद्योजकांना लॉकडाऊन नंतर उद्योग क्षेत्रामध्ये उभारी घेण्यासाठी प्रोत्साहन सुद्धा दिल. त्यांच्या प्रश्नांचे तसेच समस्यांचे वाणिज्य विभाग, वित्त विभाग, रेल्वे विभाग तसेच इतर संबंधित विभागांच्या मंत्र्यांसोबत पत्रव्यवहार आणि चर्चा करुन निराकरण करण्याचा सुद्धा प्रयत्न त्यांनी केला. त्यांनी या संकट समयी या सर्व समाज घटकांना मनोबल न खचू देता या आपत्तीचे रूपांतर संधीमध्ये करण्याचे आवाहन केले आहे.

देशात होणारी आयात कमी करून निर्यातीला वृद्धिंगत करण्यासाठी आणि देशांतर्गत उत्पादन वाढवण्यासाठी केंद्र सरकार आवश्यक ते संपूर्ण सहकार्य उद्योजकांना करेल अशी ग्वाही सुद्धा त्यांनी या संवादादरम्यान दिली. मुंबई-पुणे, गुडगाव अशा विकसित शहरांशिवाय इतरही शहरांमध्ये उद्योग वाढीला चालना मिळावी ज्यामध्ये कृषी आधारित उद्योगांचा समावेश असावा जेणेकरून स्थानिक युवकांना रोजगार मिळेल असे आवाहन त्यांनी उद्योजकांना केले.

गेल्या दहा दिवसांमध्ये विविध व्यावसायिक संघटना, पत्रकार संघ, उद्योजक तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांशी व्हिडिओ कॉन्फरन्सिंग च्या माध्यमातून गडकरींनी संवाद साधला तसेच त्यांच्याकडून प्राप्त सूचना व प्रतिसाद संबंधित विभागांना त्यांनी कार्यवाहीसाठी पाठविले आहेत .यामध्ये असोचॅम, फिक्की, पीएचडी चेंबर ऑफ कॉमर्स, एआयपीएमए, भारतीय शिक्षण मंडळ ,यंग प्रेसिडेंट ऑर्गनायझेशन ,महाराष्ट्र इकॉनॉमिक डेव्हलपमेंट कौन्सिल, सीईओ क्लब ऑफ इंडिया, भारत चेंबर ऑफ कॉमर्स, क्रेडाई मुंबई या संस्थांच्या प्रतिनिधींशी त्यांनी विविध समाज माध्यमांच्या माध्यमातून आणि प्रसार माध्यमातून संवाद साधला. यामध्ये इंग्लड, अमेरिका तसेच अरब देशातील नागरिकांनी सुद्धा आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

या संवादाच्याच श्रृंखलेमध्ये २६ एप्रिल रोजी त्यांनी विदेशातील विद्यार्थी आणि विद्वानांशी संवाद साधला . यामध्ये युके, कॅनड, सिंगापूरर, ऑस्ट्रेलिया स्थित ४३ नामांकित विद्यापीठांमध्ये शिकणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांनी या व्हिडिओ कॉन्फरन्सिंगमध्ये सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांना उद्देशून ते म्हणाले की,'प्रत्येकातील सकारात्मकता हा भारतासाठी पुढे जाण्याचा मार्ग असून या प्रतिकूलतेला संधीमध्ये रूपांतरित करण्यासाठी ठोस प्रयत्न सुरु आहेत. विविध उपक्रमांची सुरुवात करीत असताना कोविड -१९ विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी आपण सर्वांनी आरोग्यविषयक खबरदारीच्या नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. मोठ्या, मध्यम, लहान किंवा सूक्ष्म उद्योग व्यावसायिकांनी मास्क, सॅनिटायझरच्या वापराबरोबरच शारीरिक अंतर नियमांचे पालन करून त्यांच्या कर्मचाऱ्यांना अन्न, निवाऱ्याची सोय उपलब्ध करून द्यावी तसेच त्यांच्या उद्योग धोरणात आमूलाग्र बदल करून त्यांचे उद्योग मोठ्या शहराबाहेर नवीन ठिकाणी सुरु करावेत जेणेकरून महानगरांवरचा ताण कमी होईल'. ते म्हणाले की, भारतातील कंपन्यांनी जागतिक कंपन्यांबरोबर नवीन भागीदारी करण्याची गरज आहे. बऱ्याच कंपन्यांना चीनमधून बाहेर पडायचे आहे त्यामुळे केवळ भारतीय बाजारपेठेची मागणी पूर्ण करण्याएव्हढेच आपले प्रयत्न सीमित नाहीत तर जागतिक बाजारपेठेची मागणी पूर्ण करणे आवश्यक आहे असे गडकरी म्हणाले. भारतीय तरुणांमध्ये जगाचे नेतृत्व करण्याची क्षमता असल्यामुळे हे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी परदेशात शिक्षण घेणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे असे आवाहन गडकरी यांनी केले.

गडकरी यांनी नमूद केले की २२ हरित द्रुतगती महामार्ग विकसित होत असून दिल्ली-मुंबई द्रुतगती महामार्गाचे संरेखन करण्याचे काम सुरू झाले आहे. यामुळे उद्योगांना भविष्यात औद्योगिक क्लस्टर, औद्योगिक उद्याने, लॉजिस्टिक पार्क, इ. मध्ये गुंतवणूक करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. या महामार्गालगत जवळपास २००० सुविधा विकसित केल्या जातील तसेच देशभरात २००० बस डेपो उभारण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले.